# वीजदर पुस्तिका

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका)

वित्तिय वर्ष २०२५-२६ ते वित्तिय वर्ष २०२९-३०
पर्यंतची वीजदर अनुसूची

वीजदर अनुसूची
(१ एप्रिल २०२५ पासून लागू)
(आयोगाच्या दिनांक २९.०४.२०२५ च्या दुरुस्ती आदेशातील बद्दलांसहित)

या वीजदर पत्रक अनुसूचीच्या मराठी अनुवादातील व इंग्रजी वीजदर अनुसूचीमधील कोणत्याही शब्दांचा / मजकुराचा अर्थ निश्चित करताना कोणताही वाद उद्भवल्यास आणि / किंवा कोणतीही विसंगती आढळल्यास मूळ इंग्रजीतील वीजदर अनुसूची ग्राहय धरण्यात यावी.

# बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

## (बृहन्मुंबई महानगरपालिका)

## वीजदरांची अनुसूची

## (दिनांक १ एप्रिल,२०२५ पासून लागू)

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६१ आणि ६२ अन्वये आपल्या निहित अधिकारांचा वापर करुन आणि त्यास सक्षम केलेल्या इतर सर्व अधिकारानुसार, २०२४ चे प्रकरण क्र.२०७ मधील बहुवर्षिय वीजदर याचिकेबाबत दि.२८ मार्च २०२५ च्या आदेशानुसार आयोगाने निश्चित केलेले, बेस्ट उपक्रमाच्या विविध वर्गातील वीज ग्राहकांसाठी वीज पुरवठयाचे दर दि.१ एप्रिल,२०२५ पासून लागू होतील.

**<u>सर्वसाधारण (जनरल)</u> :-**

१.० सध्या प्रचलित असलेल्या सर्व विद्युत दरांना सदर विद्युत दर अधिक्रमीत करतील.

२.० आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अधीन राहून सुधारित वीज दर आणि / किंवा अधिभार वितरण परवानाधारकांतर्फे आकारण्यात येईल.

३.० शासकीय किंवा इतर सक्षम प्राधिकरणातर्फे आकारण्यात येणा-या वीज शुल्क, विजेच्या विक्रीवरील कर, व इतर शुल्क हे वीजदरा व्यतिरिक्त असेल आणि सर्व ग्राहकांना वीजदरा व्यतिरिक्त आकारण्यात येईल.

४.० एकाच जागी / ठिकाणी करण्यात येणा-या वीज पुरवठयाला सदर वीजदर लागू होतील.

५.० वितरण परवानाधारक,आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता विनियम २०२१ च्या अधीन राहून जेथे एखाद्या प्रवर्तनात वापर होत असलेल्या भारात जर मोठे चढउतार होत असल्याचे आढळल्यास तेथे ३० मिनिटांपेक्षा कमी / १५ मिनिटांपेक्षा जास्त कालावधीतील अधिकतम मागणीचे मापन करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

६.० प्रचलित विनियमांमधील तरतूदीनुसार आणि आयोगाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार सदर विद्युत दर आहेत.

७.० स्पष्टपणे वेगळे सांगितले नसेल तर, महिन्याभरात वापरल्या जाणा-या ऊर्जेसाठी ऊर्जा आकार आणि वहन आकाराची आकडेवारी रुपयामध्ये प्रति युनिट (केडब्ल्यूएच किंवा केव्हीएएच जसे असेल तसे) मध्ये दिले आहे.

८.० इंधन समायोजन आकार (FAC) हा बहुवर्षिय वीजदर विनियम २०२४ च्या तरतुदीनुसार गणला जातो आणि आयोगाने याबाबत वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे सर्व प्रवर्गातील ग्राहकांवर लागू असेल व तो मूळ वीजदराशिवाय वापर केलेल्या वीजेवर गणना करुन आकारण्यात येईल.

## लघुदाब (एल्.टी) वीजदर

## लघुदाब I (ए): एल्.टी–निवासी (दारिद्रय रेषे खालील)(बी.पी.एल)

**पात्रता:**

ज्या वीजग्राहकांनी मागील वित्तिय वर्षामध्ये प्रतीवर्षी ३६० युनिटस पर्यंतचा वापर केला आहे आणि ज्यांचा मंजूर विद्युत भार ०.२५ किलोवॅट पर्यंत आहे, अशा वीजग्राहकांसाठी दारिद्रय रेषेखालील वीजदर लागू आहेत. अशा ग्राहकांची पात्रता प्रत्येक वित्तिय वर्षाच्या अखेरीस पुनश्च: निर्धारित केली जाईल. जर मागील वित्तिय वर्षामध्ये ३६० युनिटस्पेक्षा जास्त युनिटस वापरले असतील तर असे वीज ग्राहकांना एल्.टी I (बी) – निवासी प्रवर्गाचे वीजदर लागू होतील, आणि भविष्यातील त्याचा वीज वापर विचारात न घेता, असा ग्राहक पुन्हा निवासी (दारिद्रय रेषेखाली) प्रवर्गात पात्र ठरणार नाही.

जर वर्षाच्या काही भागासाठी वीजेचा वापर केला गेला असेल, तर दारिद्रय रेषेखालील वीजग्राहकांची वर्गवारी यथाप्रमाणे तत्वावर वित्तिय वर्षाच्या अखेरीस पुन: र्निधारण केली जाईल, मागील वर्षादरम्यान वाढलेल्या दारिद्रय रेषेखालील वीजग्राहकांची वर्गवारी यथाप्रमाणे तत्वावर आधारित म्हणजेच ३० युनिटस प्रति महिनानुसार निर्धारीत केले जाईल.

दारिद्रय रेषेखालील प्रवर्ग हा ज्यांचा पहिल्या बिलिंग महिन्यात मंजूर भार ०.२५ किलो वॅट आणि १ ते ३० युनिटस् दरम्यान वीजेचा वापर (१ युनिट / दिवसाच्या यथाप्रमाणे तत्वावर) अशा कोणत्याही महिन्यात जोडलेल्या सर्व नवीन ग्राहकांना देखील लागू होईल.

बी.पी.एल वीजदर केवळ वैयक्तिक वीजग्राहकांना लागू असून संस्थांना लागू नाही.

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| **वापर टप्पा (के.डब्लू.एच.)** | **स्थिर/मागणी आकार (रु./जोडणी/महिना)** | **ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)** | **वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)** |
|---|---|---|---|
| दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.)प्रवर्ग | १२ | १.५२ | २.१० |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| **वापर टप्पा (के.डब्लू.एच.)** | **स्थिर/मागणी आकार (रु./जोडणी/महिना)** | **ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.)** | **वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.)** |
|---|---|---|---|
| दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.)प्रवर्ग | १२ | १.५२ | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./जोडणी/महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.)प्रवर्ग | १२ | १.५२ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./जोडणी/महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.)प्रवर्ग | १२ | १.५२ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./जोडणी/महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| दारिद्रय रेषेखालील (बी.पी.एल.) प्रवर्ग | १२ | १.५२ | १.८५ |

| टीओडी टप्पा | अवधी (तास) | कालावधी (तास) | टीओडी दर (सूट): एल्.टी - बी.पी.एल निवासी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आ.व. २०२५-२६ | आ.व. २०२६-२७ | आ.व. २०२७-२८ | आ.व. २०२८-२९ | आ.व. २०२९-३० |
| – | ००:०० ते ०६:०० | ६ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |
| – | ०६:०० ते ०९:०० | ३ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |
| सौर तास | ०९:०० ते १७:०० | ८ | रु. ०.५०/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.५५/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.६०/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.६५/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.७०/ केडब्ल्यूएच (सूट) |
| पीक (Peak) तास | १७:०० ते २४:०० | ७ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |

टिप: एलटी - । प्रवर्गातील ग्राहक जर स्मार्ट मिटर धारक असेल तर त्यांस टीओडी सूट लागू होईल.

## लघुदाब I (बी) : लघुदाब –निवासी

**पात्रता :-**

सदर वीजदर प्रवर्ग निम्न / मध्यम व्होल्टेजवर वापरल्या जाणा-या विद्युत उपकरणांसाठी जसे प्रकाश (दिवे) व्यवस्था, गरम करणे, थंड करणे, स्वयंपाक करणे, धुणे / साफसफाई, मनोरंजन / विश्रांती, पाण्याचे पंपींग यासारख्या उद्देशाने खालील आवारात वापरल्या जाणा-या वीजेसाठी लागू आहे.

ए) खाजगी निवासी परिसर, शासकीय आणि निमशासकीय निवासी वसाहत,खाजगी संस्थांचे कर्मचारी वसाहत / वसतिगृहे / विश्रामगृहे.

बी) पूजेसाठी वापरला जाणारा परिसर जसे मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, मशिदी इत्यादी, मात्र संलग्न हॉल्स, बागा किंवा अशा परिसराचा इतर भाग जो व्यावसायिक उद्देशासाठी वापरला जाईल त्यास प्रचलित एलटी ॥ वीजदर आकारण्यात येईल,जोपर्यंत इतर श्रेणीमध्ये निर्दिष्ट केलेले नाही.

सी) शासकीय / खाजगी / सहकारी गृहनिर्माण वसाहती / संकुले येथील (जिथे वीज केवळ घरगुती उद्देशाने वापरली जाते) फक्त सामाईक सुविधा जसे की, पाणी पंपिंग / रस्ते आणि सामाईक क्षेत्रातील प्रकाश (दिवे)/ लिफ्ट / पार्किंग लॉट / अग्निशमन पंप व इतर उपकरणे इत्यादी.

डी) सरकारी / खाजगी / सहकारी गृहनिर्माण संस्था / संकुले यांचे त्याच आवारातील स्पोर्टस क्लब किंवा सुविधा / हेल्थ क्लब किंवा सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव / कम्युनिटी हॉल आणि त्याचा फक्त त्याच गृहनिर्माण संस्था / संकुलातील सभासद आणि कर्मचारी वापर करत असल्यास.

ई) अपंग व्यक्ती (Person with disabilities) / अपंग व्यक्तींच्या मालकीचे / संचालित टेलिफोन बूथ.

एफ्) वकील, डॉक्टर, अभियंते, चार्टर्ड अकाउंटंटस इत्यादी व्यावसायिकांनी त्यांच्या व्यावसायिक क्रियाकलापांच्या उपयोगाकरीता वापरलेले निवासी परिसर, परंतु नर्सिंग होम आणि सर्जिकल वॉडर्स किंवा हॉस्पिटल यांचा समावेश नसलेले.

जी) मर्यादीत उद्देशाच्या वापरासाठी, सिंगल-फेज घरगुती पीठ गिरणी (घर-घंटी).

एच्) निवासी एलटी ग्राहक, ज्याचा वापर प्रती महिन्यात ५०० युनिट (पुरवठ्याचा महिना) पर्यंत आहे, जो आपल्या विद्यमान जागेत बांधकाम किंवा नूतनीकरणाची कामे करतो : अशा ग्राहकाला स्वतंत्र तात्पुरती जोडणी आवश्यक नाही आणि अशा वीज ग्राहकांना निवासी दराच्या दराने देयक आकारले जाईल.

आय्) घरगुती राहण्याची सोय, पर्यटन स्थळे व धार्मिक स्थळावर रहाण्याची (Home-stay) सुविधा.

जे) ग्राहक त्यांच्या निवासस्थानाच्या भागातून व्यवसाय किंवा वाणिज्यिक / औद्योगिक / अनिवासी उपक्रम राबवित आहेत, ज्यांचा मासिक वापर महिन्यात ३०० युनिटस् पर्यंत आहे आणि मागील आर्थिक वर्षात वार्षिक वापर ३६०० युनिटस् पर्यंत होता, अशा ग्राहकांना या वीजदराच्या पात्रतेचे मूल्यमान प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी केले जाईल. मागील आर्थिक वर्षातील वापर ३६०० युनिटपेक्षा जास्त झाला असेल तर असे ग्राहक त्यानंतर या प्रवर्गाअंतर्गत शुल्कासाठी पात्र ठरणार नाहीत, परंतु अशा प्रकारच्या वापरासाठी लागू असणा-या वीजदरावर शुल्क आकारले जाईल, हयाची पूर्वसूचना वीज ग्राहकास दिली जाईल.

के) खालील बाबींमधील वीज (अडचणी दूर करणे) आठव्या आदेश २००५ नुसार निवासी उद्देशाने निम्न /मध्यम व्होल्टेजवर एकाच ठिकाणी वीजपुरवठा केला जातो.

(i) आवाराची मालकी असणारी सहकारी गट गृहनिर्माण संस्था त्याच सोसायटीच्या सदस्यांना निवासी हेतूंसाठी त्याच परिसरात राहणाऱ्यांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी आणि,

(ii) एखादया व्यक्तीस, निवासी उद्देशाने त्याच आवारात राहणा-या आपल्या कर्मचा-यांना वीज उपलब्ध करुन देण्यासाठी.

एल) प्रकाश योजनासह सर्व कारणांसाठी विद्युतदाहिनी, पाण्याचे पंपसंच इत्यादी स्मशानभूमी आणि दफनभूमीसाठी.

.

एम) तात्पुरत्या स्वरुपात गणेशोत्सव, नवरात्र, ईद, मोहरम, रामलीला, दिवाळी, नाताळ (Christmas), गुरु नानक जयंती, गोपालकाला उत्सव, दसरा इत्यादी सार्वजनिक धार्मिक कार्याकरिता आणि ज्या ठिकाणी सामुदायिक प्रार्थना केल्या जातात आणि गांधी जयंती, आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, महाराष्ट्र दिन इत्यादीसारख्या सार्वजनिक सुट्टया जाहीर केल्या गेलेल्या व्यक्तिमत्त्वांचे वर्धापन दिन स्मरणार्थ आणि राष्ट्रीय किंवा राज्य कार्यक्रमांच्या समारंभासाठी.

परंतु अशा प्रकारच्या तात्पुरत्या जोडण्या हया १.५ पट स्थिर आकाराच्या अधिन असेल.

टिप: सदर वीजदर प्रवर्ग हा उच्च व्होल्टेजवर वीजपुरवठा करणा-या ग्राहकांना देखील लागु असेल. वरील /उपरोक्त (आय) आणि (जे) वगळून इतर सर्व उद्देशांसाठी.

एल्.टी I (बी) साठी वीजदरांची अनुसूची: लघु दाब – निवासी

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार $$ | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| ०-१०० एकके | रू. ९०/- प्रति महिना | १.७४ | २.१० |
| १०१–३०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ५.३३ | २.१० |
| ३०१-५०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ९.८१ | २.१० |
| ५०० एककेपेक्षा जास्त | रू. १६०/- प्रति महिना | १२.०१ | २.१० |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार $$ | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| ०-१०० एकके | रू. ९०/- प्रति महिना | २.०२ | १.८२ |
| १०१–३०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ५.३५ | १.८२ |
| ३०१-५०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | १०.०४ | १.८२ |
| ५०० एककेपेक्षा जास्त | रू. १६०/- प्रति महिना | ११.२५ | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार $$ | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| ०-१०० एकके | रू. ९०/- प्रति महिना | २.१० | १.८७ |
| १०१–३०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ५.५० | १.८७ |
| ३०१-५०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | १०.१८ | १.८७ |
| ५०० एककेपेक्षा जास्त | रू. १६०/- प्रति महिना | ११.५५ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार $$ | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| ०-१०० एकके | रू. ९०/- प्रति महिना | २.०९ | १.८७ |
| १०१–३०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ५.६२ | १.८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३०१-५०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | १०.४८ | १.८७ |
| ५०० एककेपेक्षा जास्त | रू. १६०/- प्रति महिना | ११.८५ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार $$ | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| ०-१०० एकके | रू. ९०/- प्रति महिना | १.५५ | १.८५ |
| १०१–३०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ५.१९ | १.८५ |
| ३०१-५०० एकके | रू. १३५/- प्रति महिना | ९.६८ | १.८५ |
| ५०० एककेपेक्षा जास्त | रू. १६०/- प्रति महिना | ११.०५ | १.८५ |

| टीओडी टप्पा | अवधी (तास) | कालावधी (तास) | टीओडी दर / (सूट) एल्.टी निवासी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आ.व. २०२५-२६ | आ.व. २०२६-२७ | आ.व. २०२७-२८ | आ.व. २०२८-२९ | आ.व. २०२९-३० |
| – | ००:०० ते ०६:०० | ६ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |
| – | ०६:०० ते ०९:०० | ३ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |
| सौर तास | ०९:०० ते १७:०० | ८ | रु. ०.५०/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.५५/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.६०/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.६५/ केडब्ल्यूएच (सूट) | रु. ०.७०/ केडब्ल्यूएच (सूट) |
| पीक (Peak) तास | १७:०० ते २४:०० | ७ | ०% | ०% | ०% | ०% | ०% |

**टीप :**

अ) $$ :उपरोक्त स्थिर आकार एकेरी प्रावस्था (सिंगल फेज) जोडणीसाठी आहेत. तीन प्रावस्था (थ्री फेज) पुरवठा जोडणी टप्प्यातील पुरवठा घेणा-या निवासी वीज ग्राहकांसाठी प्रतीमाह रु.१६० स्थिर आकार आकारला जाईल. अतिरिक्त स्थिर आकार रु.२५० प्रती १० किलोवॅट किंवा १० किलोवॅट भारापेक्षा अधिकच्या अंशतः भागांवर देय असेल.

ब) व्यावसायिक जसे की वकील, शिक्षक, डॉक्टर, व्यावसायिक अभियंते, चार्टर्ड अकांऊंटटस इत्यादी केवळ त्यांचा व्यवसाय करण्यासाठी परिसर वापरत असतील, ते या शुल्कासाठी पात्र ठरणार नाहीत आणि अशा संबंधित प्रवर्गांना लागू असलेल्या वीजदरानुसार शुल्क आकारले जाईल.

क) एलटी-। प्रवर्गातील ग्राहक जर स्मार्ट मिटर धारक असेल तर त्यांस टीओडी सूट लागू होईल.

## <u>एल टी –II: एल्.टी. - अनिवासी किंवा वाणिज्य</u>

**<u>पात्रता :</u>**

### अ) <u>०-२० (केडब्लू)</u>

सदर वीजदर प्रवर्ग निम्न / मध्यम व्होल्टेजवर प्रकाश (दिवे) व्यवस्था,गरम करणे, थंड करणे, स्वयंपाक करणे, धुणे / साफसफाई करणे, मनोरंजन / विश्रांती आणि पाण्याचे पंपिंग या उद्देशाकरिता वापरल्या जाणा-या विविध उपकरणे चालवण्यासाठी अनिवासी, बिगर औदयोगिक आणि / किंवा वाणिज्यिक परिसरातील वाणिज्यिक उपयोगासाठी वापरल्या जाणा-या वीजेसाठी लागू आहे, परंतु खालील परिसरासाठी मर्यादित नाही.

ए) शॉपिंग मॉल्स आणि शोरुम्स सहित, अनिवासी, वाणिज्यिक आणि व्यवसाय परिसर, प्रदर्शन केंद्रासहित.

बी) कोठारे (Warehouses)/ गोदामे.

सी) फिल्म स्टुडीओज, चित्रपटगृहे, नाटयगृहे (मल्टिप्लेक्ससह), आतिथ्य, विश्रांती, सभा / टाऊन हॉल्स आणि मनोरंजन व सार्वजनिक करमणूकीसहीत, करमणूकीशी संबंधित व्यवस्थेच्या सामाईक प्रकाश व्यवस्था आणि वीज पुरवठा करण्याकरीता.

डी) वाणिज्य आस्थापनासहित कार्यालये.

इ) एल-टी-I प्रवर्गात नसलेले विवाह दालन (हॉल), रेस्टॉरंन्टस् / उपहारगृहे, कॅफेटेरिया, आईस्क्रिम पार्लर्स, चहा/कॉफी शॉप्स, अथितीगृह (गेस्ट हाऊसेस), इंटरनेट /सायबर कॅफेज, टेलिफोन बूथ, आणि फॅक्स / छायाप्रत दुकाने.

एफ) ऑटोमोबाईल आणि इतर सर्व प्रकारच्या दुरूस्ती, सर्व्हिसिंग आणि देखभाल केंद्रे (विशेषत: दुस-या वीजदर प्रवर्गात नसल्यास) गॅरेजसह किरकोळ गॅस भरण्याचे स्टेशन, पेट्रोल पंप व सेवाकेंद्र.

जी) टोल वसूली नाका (प्लाझा).

एच) टेलरिंग दुकाने, संगणक प्रशिक्षण संस्था, टायपिंग संस्था, छायाचित्र प्रयोगशाळा, ब्यूटी पार्लर आणि सलून, खाजगी प्रशिक्षण केंद्र, धुलाई केंद्र. मोबाईल (शॉपीज) दुकाने.

आय) बँका आणि एटीएम केंद्रे, टेलिफोन एक्सचेंज, टीव्ही स्टेशन्स, मायक्रोवेव्ह स्टेशन्स, रेडिओ स्टेशन्स.

जे) वाणिज्य संकुलामधील सामाईक सुविधा, जसे कि पाण्याचे पंपिग / लिफ्ट्स / अग्निशमन पंप्स आणि इतर उपकरणे / रस्ते आणि अन्य सामाईक क्षेत्रातील प्रकाश व्यवस्था इत्यादि.

के) स्पोर्ट्स क्लब / सुविधा, हेल्थ क्लब /सुविधा, व्यायामशाळा, जलतरण तलाव इतर कोणत्याही प्रवर्गात समाविष्ट नसलेले.

एल) महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) किंवा संबंधित स्थानिक प्राधिकरणाद्वारे मान्यता प्राप्त स्मारके / ऐतिहासिक / वारसा इमारतींचे बाहय रोषणाई.

एम्) सर्व प्रकारच्या संरचना / पायाभूत सुविधा जसे की इमारती, पूल, उड्डाणपूल, धरणे, उर्जा स्टेशन, रस्ते, विमानतळ, बोगदे यांच्या बांधकामासाठी, वरील सर्व उद्देशांसाठी पाईपलाईन टाकण्याचे कामासंबंधित.

**टीप**: एल-टी निवासी ग्राहक जे प्रति महिना ५०० युनिटस पेक्षा अधिक वीजेचा वापर करत असतील (पुरवठयाचा विदयमान महिना) आणि ज्यांनी त्यांच्या राहत्या जागेत बांधकाम किंवा नूतनीकरणाची कामे केली आहे. अशा ग्राहकांना तात्पुरत्या प्रवर्गाची वीज जोडणी घेण्याची आवश्यकता नाही, त्यांना एल टी ॥ वाणिज्य वीजदराने शुल्क आकारण्यात येईल;

एन) दूध संकलन केंद्रे, स्वतंत्र दूध शीतगृहे, साठवणूक केंद्रे.

ओ) एलटी - सार्वजनिक सेवा किंवा एलटी - औद्योगिक प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले वाणिज्य संकुलातील मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र.

पी) जाहिराती, जाहिरात फलक (दिवा स्तंभावर लावलेले / रस्त्याच्या बाजूला संच मांडणी केलेल्या जाहिरात फलकासहित) आणि इतर व्यावसायिक रोषणाई जसे की बाहय प्रकाशझोत, प्रदर्शन, विविध वस्तू भांडारातील निऑन चिन्हे, मॉल्स, मल्टिप्लेक्स, सिनेमागृहे, क्लब आणि अशा इतर आस्थापना.

क्यू) निवासी प्रवर्गांतर्गत न येणा-या अन्य कार्याकरिता तात्पुरता वीज पुरवठा.

परंतु तात्पुरता वीज पुरवठा घेणारा ग्राहक १.५ पट लागू असलेले स्थिर / मागणी आकार आणि लागू असलेले १.२५ पट ऊर्जा आकार प्रदान करेल.

तसेच, निवासी किंवा अन्य आवारात अग्निशमन पंप आणि उपकरणांच्या प्रवर्तनाकरिता घेतलेल्या तात्पुरता वीजपुरवठयास त्या-त्या आवाराला लागू असलेले वीजदर प्रवर्गानुसार आकारले जातील.

**बी) <u>२० केडब्ल्यू आणि ≤ ५० केडब्ल्यू (सी) > ५० केडब्ल्यू</u>**

**पात्रता :**

एलटी ॥ (ए) मध्ये वर्णन केलेल्या पात्रतेप्रमाणे आणि या उपश्रेणीमध्ये लागू असलेल्या श्रेणीतील मंजूर लोडसाठी, म्हणजेच एलटी ॥ (बी) आणि एलटी ॥ (सी).

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | स्थिर / मागणी आकार | ऊर्जा आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) |
|---|---|---|---|
| (अ) ०-२० (केडब्लू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.५५ | २.१० |
| (ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.८१ | २.०१ |
| (क) > ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.३३ | २.०१ |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | स्थिर / मागणी आकार | ऊर्जा आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) |
|---|---|---|---|
| (अ) ०-२० (केडब्लू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.१७ | १.८२ |
| (ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.९४ | १.७४ |
| (क) > ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.९१ | १.७४ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | स्थिर / मागणी आकार | ऊर्जा आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) |
|---|---|---|---|
| (अ) ०-२० (केडब्लू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.०४ | १.८७ |
| (ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.६३ | १.८० |
| (क) > ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.६३ | १.८० |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | स्थिर / मागणी आकार | ऊर्जा आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) |
|---|---|---|---|
| (अ) ०-२० (केडब्लू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.५४ | १.८७ |
| (ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.८५ | १.८० |
| (क) > ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.९१ | १.८० |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | स्थिर / मागणी आकार | ऊर्जा आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रु./के.डब्लू.एच.) (रु./के.व्ही.ए.एच.) |
|---|---|---|---|
| (अ) ०-२० (केडब्लू) | रू. ४७५ प्रति महिना | ५.८१ | १.८५ |
| (ब) > २० (केडब्लू) आणि ≤ ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.१६ | १.७८ |
| (क) > ५० (केडब्लू) | रू.३०० प्रति केव्हिए | ५.२९ | १.७८ |

| टीओडी टप्पा | अवधी (तास) | कालावधी (तास) | टीओडी दर / (सूट) प्रवर्गासाठी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आ.व. २०२५-२६ | आ.व. २०२६-२७ | आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३० |
| – | ००:०० ते ०६:०० | ६ | -१०% | -१५% | -२०% |
| – | ०६:०० ते ०९:०० | ३ | ०% | ०% | ०% |
| सौर तास | ०९:०० ते १७:०० | ८ | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -२०% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-३०% (ऑक्टोबर ते मार्च) |
| पीक (Peak) तास | १७:०० ते २४:०० | ७ | +२०% | +२०% | +२०% |

**टीप :**

अ) टी.ओ.डी. वीजदर, एल्टी. ॥ (ए)-१० केडब्ल्यूपेक्षा जास्त, एल्टी. ॥ (बी) आणि (सी ) प्रवर्गाला लागू आहेत आणि एल्.टी. ॥ (ए) १० केडब्ल्यूपेक्षा कमी प्रवर्गाच्या टी.ओ.डी. मीटर असणाऱ्या वीजग्राहकांना पर्यायी उपलब्ध असतील.

ब) एल्टी. ॥ (ए) वाणिज्य ( २० किलावॅट पर्यंत) प्रवर्गासाठी वीजदर रु.प्रति केडब्ल्यूएच प्रमाणे तर एल्टी. ॥ (बी) आणि (सी ) वाणिज्य प्रवर्गासाठी रु.प्रति केव्हीएएच प्रमाणे आकारला जाईल.

**<u>एल्.टी. III - एल्.टी. - औद्योगिक</u>**

**<u>एल्.टी. III (ए): एल्.टी - औद्योगिक (२० किलो वॅट पर्यंत भार)</u>**

**<u>एल्.टी. III (बी): एल्.टी- औद्योगिक (२० किलो वॅट पेक्षा अधिक भार)</u>**

**पात्रता :-**

सदर वीजदर प्रवर्ग,उत्पादन आणि प्रक्रिया उद्‌देशांसाठी, तसेच त्या औद्योगिक आवारात सामाईक प्रकाश (दिवे), गरम / थंड करणे इत्यादी औद्योगिक वापरासाठी कमी / मध्यम व्होल्टेज स्वरुपात वीज पुरवठ्याकरिता लागू आहे.

प्रशासकीय कार्यालये / कॅन्टीन, मनोरंजन हॉल / स्पोर्टस् क्लब किंवा सुविधा / हेल्थ क्लब किंवा सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव जे केवळ औद्योगिक कर्मचा-यांच्या वापराकरिता असतील असे, उद्‌वाहन, पाण्याचे पंप, अग्निशमन पंप आणि उपकरणे, रस्ते व सामाईक आवारातील दिवे, संशोधन व विकास गट, इत्यादी – या करिता देखील सदर वीजदर वीज / ऊर्जा पुरवठयाच्या वापराकरिता लागू आहे.

तसेच, अशा सर्व सुविधा त्याच औद्योगिक आवारात असतील आणि एकाच जागेवरून (पॉईंटमधून) वीज पुरवठा होत असल्यास.

महाराष्ट्र राज्य सरकारने लागू केलेल्या माहिती तंत्रज्ञान / आय.टी धोरणात परिभाषित केल्यानुसार माहिती तंत्रज्ञान (आय.टी) किंवा आय.टी तत्सम सेवा (आय.टी.इ.एस.) युनिटच्या वीज / ऊर्जा वापरण्यासाठी सदर वीजदर प्रवर्ग लागू असेल.

हा वीजदर प्रवर्ग महाराष्ट्र शासन धोरण २०१८ अंतर्गत एकात्मिक (integrated) लॉजिस्टीक पार्कसाठी देखील लागू होईल.

पुढील उद्देशांसाठी वीज / ऊर्जा पुरवठा (परंतु एवढयाकरिता मर्यादित नाही) देखील लागू असेल.

ए) धोबी / लाँड्री उपक्रम.

बी) पिठाची गिरणी, डाळ गिरणी, तांदूळ गिरणी, पोहा गिरणी, मसाला गिरणी, सॉ मिल्स; गुरेढोरे /कुक्कुटपालन खाद्य (feed) उत्पादन कारखाने.

सी) आईस फॅक्टरीज, आईस्क्रिम उत्पादक युनिटस्, दूध प्रक्रिया (मिल्क प्रोसेसिंग)/ शीतकरण संयंत्र (दुग्ध शाळा).

डी) हॉटेल्स / मॉटेल्स/ यूथ क्लब / रिसॉर्ट/ कॉटेजस / सेवा अपार्टमेंट, पर्यटक व्हिला / पर्यटक अपार्टमेंटस.

इ) डिस्क्ट्रिक्ट कुलींग सोल्युशनस (DCS) म्हणजे एकाच ठिकाणी थंड हवा तयार करुन ती पाइपलाईनद्वारे अनेक इमारतीपर्यंत पोहाचवण्याची पध्दत, जी एकच ठिकाणी केंद्रित असलेल्या इमारतीला, एअर कडिशनिंग सेवा पुरवते.

एफ) अभियांत्रिकी कार्यशाळा, अभियांत्रिकी वस्तू उत्पादन युनिटस्, मुद्रणालय, रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) दुरूस्ती कार्यशाळा, टायर रिट्रेडिंग / रिमॉडेलिंग युनिट्स व व्हल्कॅनाइझिंग युनिटस्, रबर उत्पादन निर्मिती, पॅकेजिंग साहित्य निर्मिती.

जी) संरक्षण दल आस्थापनांचे आयुध निर्माण / दारूगोळा कारखाने.

एच) खाणकाम, उत्खनन आणि दगड क्रशिंग युनिट.

आय) गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग युनिट्स.

जे) साबण आणि सौंदर्य प्रसाधने, दुर्गंधीनाशक उत्पादन इत्यादी.

के) एलपीजी / सीएनजी बॉटलिंग कारखाना आणि संबंधित गॅस भरणा केंद्र इत्यादी.

एल) मल:निसारण प्रक्रिया संयंत्र / उदयोगांसाठीचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्र आणि एलटी – सार्वजनिक सेवा प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले.

एम) निर्मिती संयंत्रकाला स्टार्ट-अप ऊर्जा, म्हणजेच, युनिट आणि त्याची सहाय्यकारी यंत्रणा कार्यान्वित करताना ऊर्जा संयंत्राच्या (पॉवर प्लांट) चाचणीसाठी आवश्यक असलेली ऊर्जा, आणि त्याच्या स्टार्ट-अपकरिता नियोजित किंवा सक्तीच्या आउटेजनंतर (परंतु बांधकामासाठी नाही) लागणारी ऊर्जा.

एन) विट भटटी, बायोमास पेलेट.

ओ) महाराष्ट्र शासनाच्या जैव तंत्रज्ञान धोरणाअंतर्गत समावेश असलेले जैव तंत्रज्ञान उदयोग.

पी) एल्.टी. V (बी) – कृषी (इतर) प्रवर्गांतर्गत समाविष्ट नसलेले शीतगृह (कोल्ड स्टोरेज), बंदिस्त केलेले पेयजल संयंत्र.

क्यू) अन्न प्रक्रिया युनिट (सीफूड आणि मांस यासह), खांडसरी / गूळ उत्पादन युनिटस्.

आर) एकल (Stand alone) संशोधन व विकास युनिट.

एस) दूरसंचार टॉवर आणि संबंधीत दूरसंचार पायाभूत सुविधा परंतु त्यांची कार्यालये, दुकाने (outlets) इत्यादी समाविष्ट होत नाही.

टी) केवळ निम्न / मध्यम भारावर जोडलेले पॉवरलूम्स व इतर संलग्न उपक्रम जसे रॅपिंग, डबलिंग, व्टिस्टींग (Twisting) वगैरे.

यू) अती उच्च दाब (इएचव्ही) / वितरण उपकेंद्रांना सहाय्यक वीज पुरवठा (परंतु बांधकामासाठी नाही).

व्ही) रेडी- मिक्स कॅांक्रिट किंवा हॉट मिक्स प्लांटस्.

## एल्.टी. III - एल्.टी. - औद्योगिक वीजदर

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.) /(केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार | ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच)* | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) |
|---|---|---|---|
| एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.३० | २.१० |
| एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त | रू. ४००प्रति केव्हिए | ६.१३ | २.०१ |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.) /(केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार | ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) * | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) |
|---|---|---|---|
| एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.०२ | १.८२ |
| एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त | रू.४००प्रति केव्हिए | ५.८७ | १.७४ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.) /(केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार | ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) * | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) |
|---|---|---|---|
| एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू) | रू. ४७५ प्रति महिना | ५.८४ | १.८७ |
| एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त | रू. ४००प्रति केव्हिए | ५.५१ | १.८० |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.) /(केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार | ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) * | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) |
|---|---|---|---|
| एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू) | रू. ४७५ प्रति महिना | ६.१४ | १.८७ |
| एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त | रू. ४००प्रति केव्हिए | ५.६६ | १.८० |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्ल्यू.एच.) /(केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार | ऊर्जा आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच)* | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्ल्यू.एच.) किंवा (रु./केव्हीएएच) |
|---|---|---|---|
| एल टी III (अ): ०-२० (केडब्ल्यू) | रू. ४७५ प्रति महिना | ५.४४ | १.८५ |
| एल टी III (ब): २० (केडब्ल्यू) पेक्षा जास्त | रू. ४००प्रति केव्हिए | ४.९३ | १.७८ |

| टीओडी टप्पा | अवधी (तास) | कालावधी (तास) | टीओडी दर / (सूट) प्रवर्गासाठी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आ.व. २०२५-२६ | आ.व. २०२६-२७ | आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३० |
| -- | ००:०० ते ०६:०० | ६ | -१०% | -१५% | -२०% |
| -- | ०६:०० ते ०९:०० | ३ | ०% | ०% | ०% |
| सौर तास | ०९:०० ते १७:०० | ८ | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -२०% (एप्रिल ते सप्टेंबर)<br>-३०% (ऑक्टोबर ते मार्च) |
| पीक (Peak) तास | १७:०० ते २४:०० | ७ | +२०% | +२०% | +२०% |

**टीप :**

अ) टी.ओ.डी. वीजदर, एल्टी. ।।। (अ)-१० केडब्ल्यूपेक्षा जास्त, एल्टी. ।।। (बी) प्रवर्गाला लागू आहेत आणि एल्.टी. ।।। (अ) १० केडब्ल्यूपेक्षा कमी प्रवर्गाच्या टी.ओ.डी. मीटर असणाऱ्या वीजग्राहकांना पर्यायी उपलब्ध असतील.

ब) एल्टी. ।।। (अ) औद्योगिक (२० किलावॅट पर्यंत) प्रवर्गासाठी वीजदर रु.प्रति केडब्ल्यूएच प्रमाणे तर एल्टी. ।।। (ब) औद्योगिक प्रवर्गासाठी रु.प्रति केव्हीएएच प्रमाणे आकारला जाईल.

## एल्.टी IV : सार्वजनिक सेवा

**पात्रता :**

सदर वीजदर प्रवर्ग शैक्षणिक संस्था जसे शाळा व महाविदयालये, आरोग्य सेवासुविधा जसे रूग्णालये, दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, निदान केंद्र, रक्तपेढी आणि पॅथॉलॉजी प्रयोग शाळा, ग्रंथालय आणि सार्वजनिक वाचन कक्ष यांना निम्न / मध्यम व्होल्टेजने वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था / आरोग्य सेवा सुविधेशी संलग्न असलेल्या वसतिगृह, स्पोर्टस् क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव यांना देखील लागू असेल, मात्र अशा सुविधा त्याच आवारामध्ये आणि मुख्यत्वेकरून अशा शैक्षणिक संस्था आणि रूग्णालयामधील विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्ण यांच्याकरीता असल्यास सदर वीजदर लागू असेल.

सदर वीजदर सूची सार्वजनिक स्वच्छताविषयक सुविधावरील पुरवठयासाठी देखील लागू असेल.

सदर वीजदर हे खालील कारणांसाठी (परंतु केवळ यापुरतेच मर्यादित नाही) वीज पुरवठा करण्यासाठी लागू राहील.

ए) शाळा आणि महाविदयालयांसारख्या शैक्षणिक संस्था, रूग्णालये, दवाखाने, क्लिनिक्स, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्र, निदान केंद्र, रक्तपेढी आणि पॅथॉलॉजी प्रयोगशाळा यांसारख्या आरोग्य सेवा सुविधा, ग्रंथालय आणि सार्वजनिक वाचन कक्ष.

बी) सदर वीजदर प्रवर्ग हा त्या शैक्षणिक संस्था / रुग्णालय यांच्या आवारातील असलेल्या स्पोर्टस् क्लब आणि सुविधा / आरोग्य केंद्र आणि सुविधा / व्यायामशाळा / जलतरण तलाव आणि मुख्यत: अशा शैक्षणिक संस्थेच्या / रुग्णालयाच्या विदयार्थी / शिक्षक / कर्मचारी / रूग्णांकरिता वापरात असल्यास लागू असेल.

सी) शासकीय व महानगरपालिका / स्थानिक प्राधिकरणे / स्थानिक स्वराज्य संस्था जसे महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती, पोलिस स्टेशन आणि पोलिस चौकी, टपाल कार्यालये, सशस्त्र सेना / संरक्षण आणि निम-लष्करी आस्थापना या सर्वांची कार्यालये.

डी) सेवा-केंद्रित आध्यात्मिक संस्था.

इ) महाराष्ट्र सार्वजनिक धर्मादाय संस्था अधिनियमांतर्गत नोंदणीकृत धार्मिक संस्थांकडून भाविकांसाठी निवासाची व्यवस्था.

एफ) राज्य किंवा महानगरपालिका / स्थानिक प्राधिकरण परिवहन आस्थापने त्यांच्या कार्यशाळांसह.

जी) अग्निशमन सेवा स्टेशन, जेल, तुरुंग, न्यायालये.

एच) विमानतळ.

आय) बंदरे, जेट्टी आणि किना-यावरील वीज पुरवठयासाठी तरतूद.

जे) वीज पुरवठा निम्न / मध्यम व्होल्टेजवरील असल्यास दुकाने, कार्यशाळा. आवारे इत्यादीच्या समावेशासह रेल्वे / मेट्रो / मोनोरेल स्टेशन .

के) शैक्षणिक संस्थांशी संलग्न असलेले सर्व विदयार्थी वसतिगृह.

एल) इतर सर्व विदयार्थी किंवा नोकरी करणारे पुरूष / महिला वसतिगृह.

एम) इतर प्रकारची घरे / वसतिगृहे, जसे की (i) निराधार, अपंग व्यक्ती (शारीरिक किंवा मानसिक अपंग व्यक्ती इत्यादी) आणि मानसिकरित्या आजारी व्यक्ती यांच्या करिता घरे / वसतिगृहे (ii) रिमांड होम (iii) धर्मशाळा, (iv) सुधारगृह (v) पुरवठा परवानाधारकाच्या झोनल मुख्य अभियंता किंवा तत्सम अधिकारी यांनी पडताळणी करुन पुष्टीकरणांच्या अधीन असलेली अनाथाश्रमे.

एन) धरणाचे काम ज्यात प्रकाशयोजना (lighting) आणि इतर कामे.

ओ) पाण्याचे पंपिंग, पाणी शुध्दीकरण आणि सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेशी संबंधित कामे, मल:निसारण प्रक्रिया संयंत्र आणि सामाईक कचरा प्रक्रिया संयंत्र.

पी) सार्वजनिक रस्त्यावरची प्रकाश व्यवस्था / सर्व सामान्य जनतेच्या वापरण्याकरिता असलेला खुला मार्ग, परंतु निवासी संकुल, वाणिज्य संकुल, औदयोगिक आवार इत्यादिंमधील मार्ग प्रकाशाकरिता त्या-त्या प्रवर्गाला लागू असलेले वीजदर आकारण्यात येतील.

क्यू) सार्वजनिक बागेतील प्रकाशव्यवस्था (सर्वसामान्य जनतेसाठी विनाशुल्क खुल्या असणा-या बागा).

आर) वाहतूक सिग्नल आणि वाहतूक बेट.

एस) सार्वजनिक ठिकाणी असलेले पाण्याचे कारंजे.

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | ४७५.०० | ६.२० | २.०१ | ६.४४ | २.१० |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | ४७५.०० | ५.८७ | १.७४ | ६.१० | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी /महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | ४७५.०० | ५.५३ | १.८० | ५.७४ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./प्रति जोडणी/ प्रति महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | ४७५.०० | ५.८० | १.८० | ६.०२ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| **सर्व एकके (युनिटस्)** | **४७५.००** | **५.१७** | **१.७८** | **५.३७** | **१.८५** |

| टीओडी टप्पा | अवधी (तास) | कालावधी (तास) | टीओडी दर / (सूट) प्रवर्गासाठी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आ.व. २०२५-२६ | आ.व. २०२६-२७ | आ.व. २०२७-२८ ते आ.व. २०२९-३० |
| -- | ००:०० ते ०६:०० | ६ | -१०% | -१५% | -२०% |
| -- | ०६:०० ते ०९:०० | ३ | ०% | ०% | ०% |
| सौर तास | ०९:०० ते १७:०० | ८ | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर) -२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -१५% (एप्रिल ते सप्टेंबर) -२५% (ऑक्टोबर ते मार्च) | -२०% (एप्रिल ते सप्टेंबर) -३०% (ऑक्टोबर ते मार्च) |
| पीक (Peak) तास | १७:०० ते २४:०० | ७ | +२०% | +२०% | +२०% |

**टीप :**

अ) मागणी करार / मंजूर भार १० केडब्ल्यूपेक्षा जास्त असलेल्या एल्टी. IV प्रवर्गाला हे टी.ओ.डी. वीजदर अनिवार्य असेल. आणि मागणी करार / मंजूर भार १० केडब्ल्यूपर्यंत असल्यास टी.ओ.डी. मीटर असणाऱ्या वीजग्राहकांना पर्यायी उपलब्ध असतील.

ब) मंजूर भार २० केडब्ल्यूपेक्षा जास्त असलेल्या एल्टी. IV सार्वजनिक सेवांना केव्हीएएच हा वीजदर अनिवार्य असेल आणि मंजूर भार २० के.डब्ल्यू. पर्यंत असलेल्या एल्टी. IV सार्वजनिक सेवांना केडब्ल्यूएच वीजदर उपलब्ध असेल.

**एल्.टी. V - कृषी**

**एल्.टी. V (अ): कृषी - पंपसंच**

**पात्रता :**

पंपाच्या भाराची गणना करणाऱ्या गतिदायी (जंगम) शक्तीकरिता (मोटीव्ह पॉवर) आणि पंप हाऊस मध्ये निम्न / मध्यम व्होल्टेजच्या वापरासाठी गतिदायी (जंगम) शक्तीचे (मोटीव्ह पॉवर) सर्किट जोडण्याकरिता ४० वॅट पर्यंतच्या एका दिव्यास हा वीजदर प्रवर्ग लागू आहे.

हा वीजदर प्रवर्ग फूलशेती (पुष्पसंवर्धन), फलोऊत्पादन (बागायती), रोपवाटीका आणि वृक्षारोपण यासाठी देखील लागू आहे.

हा वीजदर प्रवर्ग ऊस क्रशर आणि / किंवा चारा कटर्स अशा स्वत:च्या वापराच्या कृषी प्रक्रिया कार्यांच्या वीज पुरवठयाकरिता देखील लागू आहे, मात्र वेगळ्या मोटारच्या सहाय्याने किंवा बेल्ट ड्राईव्ह बदलून चालविलेल्या पिठ गिरणी, तेल गिरणी किंवा त्या आवारात असलेल्या एक्सपेलर (Expeller) यांना हा वीजदर लागू नाही.

**एल्.टी. V (अ) साठी वीजदर : कृषी - पंपसंच**

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (अ) कृषी - पंपसंच | ४५.०० | २.५२ | २.१० |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (अ) कृषी - पंपसंच | ४५.०० | २.५२ | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (अ) कृषी - पंपसंच | ४५.०० | २.५२ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (अ) कृषी - पंपसंच | ४५.०० | २.५२ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (अ) कृषी - पंपसंच | ४५.०० | २.५२ | १.८५ |

**टिप :** वरील उद्देशांकरिता वीज पुरवठ्याच्या उच्च दाबाचा (व्होल्टेजचा) लाभ घेणाऱ्या वीज ग्राहकांनापण या वीजदर प्रवर्गानुसार देयक आकारले जाईल.

**<u>एल्.टी. V (ब) : कृषी -इतर</u>**

**पात्रता :**

निम्न / मध्यम व्होल्टेजच्या वीज / ऊर्जा पुरवठा वापरासाठी हा वीजदर प्रवर्ग लागू असेल :-

ए) कृषी विषयक उत्पादने - प्रक्रिया किंवा इतर संबंधित शीतगृह युनिट् आणि प्री-कुलिंग संयंत्र.

बी) कुक्कुटपालन विशेषत: उबविण्यासहित (हॅचरीज) थर देणे आणि ब्रॉयलर क्रिया.

सी) उच्च तंत्र कृषीसाठी (उदा: टिश्यू कल्चर, ग्रीन हाउस, मशरुम लागवड क्रिया) पुरविण्यात आलेला वीजपुरवठा विशेषत: पीक लागवडीच्या प्रक्रियेशी थेटपणे संबंधीत असलेल्या उद्देशांसाठी वापरण्यात येतो. मात्र, कोणत्याही अभियांत्रिकी किंवा औद्योगिक प्रक्रियेसाठी लागू नाही.

डी) मत्स्यपालन, रेशीम उत्पादन, गुरे प्रजनन शेती इत्यादी.

इ) तबेला कि ज्यामध्ये विक्री काउंटर, दूध प्रक्रिया किंवा डेअरी / शीतगृहाशी संबंधीत कोणत्याही औदयोगीक / वाणिज्य कार्याचा समावेश नाही.

**<u>एल्.टी. V (ब) साठी वीजदर: कृषी - इतर</u>**

**१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (ब) कृषी – इतर | १००.०० | ४.९३ | २.१० |

**१ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (ब) कृषी - इतर | १००.०० | ४.९३ | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (ब) कृषी - इतर | १००.०० | ४.९३ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२८ ते ३१ मार्च २०२९ चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (ब) कृषी - इतर | १००.०० | ४.९३ | १.८७ |

**१ एप्रिल, २०२९ ते ३१ मार्च २०३० चे वीजदर.**

| वापर टप्पा (के.डब्लू.एच.) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|
| एल्.टी. V (ब) कृषी - इतर | १००.०० | ४.६३ | १.८५ |

**टिप :** वरील उद्‌देशाकरिता वीज पुरवठ्याच्या उच्च दाबाचा (व्होल्टजेचा) लाभ घेणाऱ्या वीजग्राहकांनापण या वीजदर प्रवर्गानुसार देयक आकारले जाईल.

## एल टी VI : एल टी - विद्युत वाहन – (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशन

**पात्रता:**

सदर वीजदर प्रवर्ग, विदयुत वाहनाच्या बॅटरी अदलाबदल (स्वॅपिंग) स्टेशनसहित विदयुत वाहन चार्जिंग स्टेशनाकरिता वीजपुरवठा करण्यासाठी लागू आहे.

ग्राहक आपल्या आवारात स्वतःचे विदयुत वाहन चार्जिंग करण्यासाठी वीजपुरवठा वापरत असल्यास, अशा आवाराच्या प्रवर्गानुसार सदर वीजदर लागू असतील. ग्राहकाला या प्रवर्गांतर्गत विदयुत वाहन (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशनसाठी वेगळे कनेक्शन घेण्याचा पर्याय आहे.

उपहारगृह, विश्रांतीकक्ष, सुविधा स्टोअर (कन्वेनियन्स स्टोअर) इत्यादी सारख्या चार्जिंग स्टेशनमधील इतर सुविधांसाठी वीज वापराकरिता वाणिज्यिक प्रवर्गाला लागू असलेल्या वीज दरानुसार शुल्क आकारले जाईल.

## एल टी VI साठी वीज दर सूची: एल टी - विद्युत वाहन – (ई.व्ही.) चार्जिंग स्टेशन

### १ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च २०२६ चे वीजदर.

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | – | ६.०६ | २.०१ | ६.३१ | २.१० |

### १ एप्रिल, २०२६ ते ३१ मार्च २०२७ चे वीजदर.

| वापर टप्पा (के.डब्लू.एच./ केव्हीएएच) | स्थिर/मागणी आकार (रु./ जोडणी/ महिना) | ऊर्जा आकार (रू./के.व्ही ए.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.व्ही ए.एच.) | ऊर्जा आकार (रू./के.डब्लू.एच.) | वहन (व्हिलिंग) आकार (रू./के.डब्लू.एच.) |
|---|---|---|---|---|---|
| सर्व एकके (युनिटस्) | – | ५.६९ | १.७४ | ५.९३ | १.८२ |

**१ एप्रिल, २०२७ ते ३१ मार्च २०२८ चे वीजदर.**

